महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई -४००००१
दूरध्वनी क्र:-०२२-२२८३०२०० Email ID : soyojana11.rdd-mh@nic.in


क्र.तीर्थवि-२०२४/प्र.क्र.३०/यो-११ दि: ०९/०३/२०२४

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व).

विषय:- ग्रामीण तीर्थक्षेत्रांना ब- वर्ग देणे व निधीची मागणी करताना घ्यावयाच्या काळजीबाबत.

संदर्भ: १. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दि. १६ नोव्हेंबर, २०१२.
२. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दि. २८ डिसेंबर, २०२३.

महोदय,

"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब-वर्ग)" अंतर्गत मा. प्रधान सचिव (ग्रामविकास) तथा अध्यक्ष, राज्य निकष समिती यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत प्राप्त झालेल्या प्रस्तावांना "ब-वर्ग" दर्जा व गट "ब-दर्जा" प्राप्त झालेल्या तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांच्या सोयीसाठी प्रस्तावित केलेल्या सुविधांच्या अंदाजपत्रकांना वर नमूद केलेल्या शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पालन करून प्रशासकीय मान्यता देण्याची शिफारस केली जाते.

०२. अशा प्रस्तावांना तपासणी करुन मान्यता देणे सोपे व्हावे यासाठी यापुढे, ग्रामीण भागातील तीर्थस्थळास "ब-वर्ग" दर्जा देण्यासाठी शासनास सादर करण्यात येणारे प्रस्ताव "प्रश्नावली-१" सह सादर करण्यात यावीत. तसेच "ब-वर्ग" दर्जा प्राप्त तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांच्या सोयीसाठी करावयाच्या सुविधांना प्रशासकीय मान्यता देण्यासाठी शासनास सादर करण्यात येणारे अंदाजपत्रके "प्रश्नावली-२" सह सादर करण्यात यावीत. तसेच सादर करण्यात येणारे अंदाजपत्रके हि कामाच्या सविस्तर तपशीलासह व एका तीर्थक्षेत्रासाठी एकच अंदाजपत्रक सादर करण्याची दक्षता घ्यावी. या प्रश्नावलींसह प्रस्ताव नसल्यास, ते प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत याची, कृपया नोंद घ्यावी. प्रश्नावली-१ व प्रश्नावली-२ चा प्रती सोबत जोडल्या आहेत.

आपला,

(का.गो.वळवी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

आवश्यक कार्यवाहीसाठी:
कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, सर्व.

## <u>प्रश्नावली -१</u> तीर्थक्षेत्र विकास योजना- तीर्थक्षेत्रास गट-ब दर्जा देण्याबाबत.

१. तीर्थक्षेत्राचे नाव व पत्ता :-

२. तीर्थक्षेत्राची स्वतची जागा असल्यास, एकुण जागा (७/१२ व गट क्रमांकासह) :-

३. तीर्थक्षेत्राची स्वतःची जागा असल्यास, विकास कामे करण्यासाठी ती जागा ग्रामपंचायत/पंचायत समिती/जिल्हापरिषद यांच्या नांवे हस्तांतरण करण्याचे रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर लिहून दिलेले प्रतिज्ञापत्र (मुळ प्रत) व या प्रतिज्ञापत्राव्दारे जागा हस्तांतरण करण्यासाठी केलेल्या कार्यवाहीची सदयस्थिती:-

४. कामे मंजूर करावयाची जागा ग्रामपंचायत किंवा शासनाची असल्यास, त्याबाबतच्या ७/१२सह:-

५. या तीर्थक्षेत्रास गट "क" चा दर्जा दिला आहे का?. असल्यास त्याबाबत प्रमाणित प्रत / इतिवृत्त:-

६. भाविकांच्या उपस्थितीबाबतचे पोलीस अधिक्षक यांचे प्रमाणपत्र:-

७. स्थानिक वन संरक्षक यांचे वन जमीन नसल्याचे प्रमाणपत्र:-

८. विकास कामे केल्यानंतर, त्या कामांचे देखभाल / दुरुस्ती करणार असल्याचे प्रमाणपत्र:-

९. **(अ)**प्रस्तावित कामे अन्य योजनेतून मंजूर नसल्याचे / प्रस्तावित केले नसल्याचे प्रमाणपत्र (ग्रामसेवक व तीर्थक्षेत्राच्या व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष /सदस्य यांच्या स्वाक्षरीसह) :-
**(ब)** या तीर्थक्षेत्राच्या स्थळी अन्य योजनेतून विकास कामे मंजूर झाली / प्रस्तावित केली असल्यास, त्याबाबतचा तपशील:-,

| अ. क्र. | शासन निर्णय क्र. व दिनांक / कामे प्रस्तावित केली असल्यास विभागाचे नाव (संबंधित प्रतसह) | मंजूर केलेल्या / प्रस्तावित केलेल्या कामाचे नांव व रक्कम | मंजुर केलेल्या कामाची सदयस्थिती |
|---|---|---|---|
| | | | |

(नाव व सही)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, ________

## प्रश्नावली २ - तीर्थक्षेत्र विकास योजना- तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी घ्यावयाची विकास कामे

१. तीर्थक्षेत्रास गट ब द-र्जा दिल्याचा शासन निर्णय क्रमांक व दिनांक :-

२. तीर्थक्षेत्रास यापुर्वी तीर्थक्षेत्र विकास योजनेंतर्गत कामांना मंजूरी दिली असल्यास, त्याबाबतचा तपशील:-

(रु. लक्ष)

| अ क्र. | प्रशासकीय मान्यतेचा शासन निर्णय क्र. व दिनांक | मंजूर केलेल्या कामांचा तपशील | प्रशासकीय मान्यता रक्कम | शासनाकडून प्राप्त निधी | कामाची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

३. तीर्थक्षेत्र विकास योजनेप्रमाणे भाविकांना खालील प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यामुळे कामे प्रस्तावित करतांना खालीलप्रमाणे प्राधान्यक्रम असावा :-

| अ. क्र. | सुविधेचे नाव **(तीर्थक्षेत्राच्या ८०० ते १००० मीटरच्या आत असणे आवश्यक)** | सध्या सुविधा उपलब्ध असल्यास, त्यांची संख्या / क्षेत्रफळ / लांबी वगैरे व जागेचा तपशील | सुविधा नव्याने प्रस्तावित केल्या असल्यास, त्यांची संख्या / क्षेत्रफळ / लांबी व सुविधा करावयाच्या जागेचा तपशील | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | पिण्याचे पाणी / पाणपोई | | | |
| २ | स्वच्छतागृह (पु) | | | |
| ३ | स्वच्छतागृह (स्त्री) | | | |
| ४ | भक्त निवास (पु) | | | |
| ५ | भक्त निवास (स्त्री) | | | |
| ६ | पोहोच रस्ता | | | |
| ७ | पथ दिवे | | | |
| ८ | संरक्षण भिंत | | | |
| ९ | भोजन कक्ष / प्रसादालय | | | |
| १० | वाहन तळ | | | |

(नाव व सही)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,___________